ePaper

**ठाकरे गटाला एकनाथ शिंदेंचा मोठा धक्का; एकाचवेळी चार बडे नेते सोडणार उद्धव ठाकरेंची साथ**

| वर्ष - 8 । अंक - 230 | UDYAM-MH-26-0158827 |




महाईन्यूज ™

### आतील पानांत


- उत्तराखंडमध्ये बारमाही पर्यटन व्हावे!
- प्रसिद्ध गायकाने ए आर रेहमान यांच्या कार्यपद्धतीवर केली टीका
- ‘छावा’प्रमाणे मीही अत्याचार भोगले!


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 7 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## सोलापूरकर, कोरटकर आणि आता जोशी बरळले !



# बेछूट ब्राह्मणांमुळे देवाभाऊ अडचणीत!

## विरोधकांचे टीकास्त्र : सारवासारव करताना देवाभाऊंची दमछाक !

**। मुंबई-पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**गेल्या काही दिवसात राज्यात वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्यांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अडचणीत आले असून प्रत्येक ठिकाणी सारवासारव करताना त्यांची दमछाक उडाली आहे. जातीयवादाचा मोठा फटका देवेंद्र फडणवीस यांना बसला असून त्यांना अडचणीत आणणारे ब्राह्मणच आहेत, ही दुर्दैवी बाब म्हणावी लागेल.**

फडणवीस ज्यावेळी सत्तेवर आले, त्यावेळी अनेक ज्येष्ठ राजकारण्यांच्या भुवया उंचावल्या होत्या, त्यामागे फडणवीस यांची जात आड आली, असे म्हटले जात होते. ते स्वतः ब्राह्मण आहेत आणि एक ब्राह्मण मुख्यमंत्री महाराष्ट्रातील बहुसंख्य जनतेला मानवणारा नव्हता. समाजामध्ये अशांतता पसरवणारी आंदोलने त्यामुळेच सुरू झाल्याचे स्पष्ट दिसते.

### विरोधकांच्या हातात कोलीत

अशातच, काही जणांनी वादग्रस्त वक्तव्य करून विरोधकांना जागे केले आणि सर्वांचे ‘टार्गेट’ झाले ते देवेंद्र फडणवीस ! ही वादग्रस्त वक्तव्ये करणारे आहेत, अभिनेते राहुल सोलापूरकर, पत्रकार संदीप कोरटकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक भैय्याजी जोशी !

### ‘अनाजीपंतां’शी तुलना !

सुरुवातीला राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अवमानास्पद वक्तव्य करून राजकीय वातावरण पेटवले. त्यानंतर ते माफी मागून मोकळे झाले. पण, वादाच्या जाळ्यात सापडले ते देवेंद्र फडणवीस ! छत्रपती शिवरायांबद्दल बोलून सोलापूरकर गप्प बसले नाहीत तर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबतही वादग्रस्त वक्तव्य करून पेटलेल्या आगीमध्ये पेट्रोलच ओतले.

### कोरटकर फरारी, कोणी लपवले ?

सोलापूरकर यांचा वाद कमी पडला म्हणून की काय नागपूरचे पत्रकार कोरटकर यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना दूरध्वनीवरून धमकावले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अद्वातद्वा बोलून पुन्हा फडणवीस यांना अडचणीत आणले. अशातच विधिमंडळाचे अधिवेशन सुरू झाले आणि सर्व गोष्टींचा खुलासा करता करता देवेंद्र फडणवीस यांची चांगलीच धावपळ झाली. हा सर्व प्रकार म्हणजे ‘अनाजीपंतां’ चा म्हणजेच ब्राह्मणांचा नवा अवतार आहे अशी तुलना करण्यापर्यंत विरोधकांनी मजल गाठली.

### आता मराठी भाषेचा अवमान

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक भैय्याजी जोशी यांनी एक नवा मुद्दा मांडून गुरुवारी विनाकारणच रान पेटवून दिले. मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी यायलाच पाहिजे, असे नाही, तर घाटकोपरची भाषा ही गुजराती आहे, असे म्हणून त्यांनी गुजराती - मराठी वादावर ठिणगी टाकली. विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खालेल्या ‘उबाठा’ गटाला रान पेटवण्यासाठी आयते बळ आणि कोलीतच मिळाले आणि स्वतः उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर चौफेर टीका सुरु केली. पूर्वी भाषावार प्रांत रचना झाली, आता भाषावार उपनगरे करून मुंबईला संपवता का, असा थेट सवाल फडणवीस यांना करण्यात आला.

### महाराष्ट्राची भाषा मराठीच होती, आहे, राहील : फडणवीस




भैय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढला गेला असून आपण मराठी भाषेचेच समर्थक आहोत असे उद्गार देवेंद्र फडणवीस यांनी काढले. महाराष्ट्राची भाषा मराठी होती.. आहे आणि यापुढेही राहील, कोणी विनाकारण संशयास्पद विधाने करू नयेत, अशी सबुरीची भाषा फडणवीस यांनी वापरली. सोलापूरकर यांनी माफी मागितली असून फरारी असलेल्या कोरटकरला ताब्यात घेण्यासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत असेही ते म्हणाले.

# पालिका कर्मचाऱ्यांसाठी 'धन्वंतरी गोल्ड' योजना

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची कबुली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आरोग्य विमा योजनेबाबत येणाऱ्या वारंवार तक्रारी विचारात घेता महापालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांसाठी धन्वंतरी गोल्ड योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा कार्यरत आणि निवृत्त अशा दहा हजार ४९३ कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना लाभ होणार आहे. वैद्यकीय उपचारासाठी एका कुटुंबासाठी वर्षाकरिता २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**




ही योजना दहा वर्षासाठी लागू करण्यात आली असून, याची अंमलबजावणी १२ मार्चपासून सुरू करण्यात येणार आहे. महापालिकेच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असलेली धन्वंतरी स्वास्थ्य योजना बंद करून २०२४ मध्ये आरोग्य विमा योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे चर्चेअंती पूर्वीच्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत सुधारणा करून धन्वंतरी गोल्ड योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेचा कार्यरत सहा हजार ७५९ कर्मचारी, त्यांची पत्नी वा पती आणि दोन अपत्ये, तर निवृत्त झालेल्या तीन हजार ७३४ कर्मचारी आणि त्यांच्या पत्नी वा पतीला लाभ मिळणार आहे. कायमस्वरूपी अपंगत्व असलेल्या त्यांच्या अपत्यालाही लाभ मिळणार आहे.'अ' आणि 'ब' संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रति महिना दीड हजार रुपये, 'क' संवर्गातील कर्मचाऱ्यांना एक हजार शंभर रुपये, तर चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना ७०० रुपयांचा स्वहिस्सा द्यावा लागणार आहे. यामधून १२ कोटी १७ लाख ३१ हजार ६०० रुपये जमा होणार आहेत. उर्वरित रक्कम महापालिकेच्या फंडातून जमा केली जाणार आहे. या योजनेंतर्गत पिंपरी-चिंचवड, पुणे शहरातील ५० रुग्णालये व सिंगल स्पेशालिटीच्या दहा रुग्णालयांबरोबर करारनामा करण्यात आला आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास या योजनेत रुग्णालयांची संख्या वाढविण्यात येणार आहे. या योजनेसाठी वर्षाकाठी ५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दरम्यान, उपचारावर २० लाखांपुढे खर्च झाल्यास वाढीव खर्चासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या १५ जणांची समिती निर्णय घेणार आहे.महापालिकेतील ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना अपत्य होत नाही, त्यांच्यासाठी पहिल्या अपत्यासाठी टेस्ट ट्यूब बेबी किंवा इन व्रिटो गर्भधारणा (आयव्हीएफ) उपचार पद्धतीसाठी एक लाख रुपयांची मदत केली जाणार आहे.एखाद्या कर्मचाऱ्याला मद्यप्राशनामुळे आजाराची लागण झाली असल्यास, डॉक्टरांनी मद्यप्राशनाचे कारण दिल्यास कर्मचाऱ्याला धन्वंतरी गोल्ड योजनेचा लाभ दिला जाणार नाही.महापालिका कर्मचाऱ्यांसाठी सुरू असलेली आरोग्य विमा योजना ११ मार्च रोजी बंद होणार आहे. त्याऐवजी धन्वंतरी गोल्ड योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी वर्षाकाठी ५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले. ही योजना दहा वर्षांसाठी लागू करण्यात आली असून, याची अंमलबजावणी १२ मार्चपासून सुरू करण्यात येणार आहे. महापालिकेच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असलेली धन्वंतरी स्वास्थ्य योजना बंद करून २०२४ मध्ये आरोग्य विमा योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तक्रारी वाढल्या होत्या.

### 'आयव्हीएफ'साठी एक लाखाची मदत

पूर्वीच्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत सुधारणा करून धन्वंतरी गोल्ड योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेचा कार्यरत सहा हजार ७५९ कर्मचारी, त्यांची पत्नी वा पती आणि दोन अपत्ये, तर निवृत्त झालेल्या तीन हजार ७३४ कर्मचारी आणि त्यांच्या पत्नी वा पतीला लाभ मिळणार आहे. कायमस्वरूपी अपंगत्व असलेल्या त्यांच्या अपत्यालाही लाभ मिळणार आहे.'अ' आणि 'ब' संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रति महिना दीड हजार रुपये, 'क' संवर्गातील कर्मचाऱ्यांना एक हजार शंभर रुपये, तर चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना ७०० रुपयांचा स्वहिस्सा द्यावा लागणार आहे.

# मनसेकडून क्रिकेट खेळून आंदोलन

## पुणे महानगरपालिकेकडे सुखसागरनगर मैदान सुरू करण्याची मागणी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरातील कात्रज भागातील सुखसागरनगर येथील हभप पुंडलिक टिळेकर मैदान सुरू झालेच पाहिजे,या मागणीसाठी मनसे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या नेतृत्वाखाली पुणे महानगरपालिकेमध्ये क्रिकेट खेळून आंदोलन करण्यात आले.यावेळी महापालिका प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.**




यावेळी मनसे पुणे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर म्हणाले, पुणे शहरातील नागरिकांना सकाळच्या वेळेत व्यायाम करण्यासाठी,तर लहान मुलांना खेळण्यासाठी बऱ्याच ठिकाणी मैदान नाही.तर ज्या ठिकाणी मैदान उपलब्ध आहेत,त्या ठिकाणी टवाळखोर मुलांकडून चुकीच्या कामासाठी तेथील मैदानाचा वापर केला जात असल्याचे समोर येत आहे. त्यावर पोलीस आणि महापालिका प्रशासनाने मार्फत कोणत्याही प्रकारची कारवाई करताना दिसत नाही.तर दुसऱ्या बाजूला कात्रज भागातील सुखसागरनगर येथील हभप पुंडलिक टिळेकर मैदान वापराविना पडून आहे.ते मैदान लहान मुलांसाठी, नागरिकांसाठी सुरू करण्यात यावे,

या मागणीसाठी आम्ही आज पुणे महानगरपालिकेच्या आवारात येऊन क्रिकेट खेळून मागणी करित आहोत आणि दुसऱ्या बाजूला महापालिकेच्या नियोजन शून्य तसेच ते पुढे म्हणाले, येत्या आठ दिवसात मैदान सुरू न झाल्यास आम्ही महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांच्या दालनात क्रिकेट खेळू असा इशारा देखील यावेळी त्यांनी दिला. मनसे पुणे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर म्हणाले, पुणे शहरातील नागरिकांना सकाळच्या वेळेत व्यायाम करण्यासाठी,तर लहान मुलांना खेळण्यासाठी बऱ्याच ठिकाणी मैदान नाही.तर ज्या ठिकाणी मैदान उपलब्ध आहेत,

त्या ठिकाणी टवाळखोर मुलांकडून चुकीच्या कामासाठी तेथील मैदानाचा वापर केला जात असल्याचे समोर येत आहे. त्यावर पोलीस आणि महापालिका प्रशासनाने मार्फत कोणत्याही प्रकारची कारवाई करताना दिसत नाही.तर दुसऱ्या बाजूला कात्रज भागातील सुखसागरनगर येथील हभप पुंडलिक टिळेकर मैदान वापराविना पडून आहे.ते मैदान लहान मुलांसाठी, नागरिकांसाठी सुरू करण्यात यावे,या मागणीसाठी आम्ही आज पुणे महानगरपालिकेच्या आवारात येऊन क्रिकेट खेळून मागणी करित आहोत आणि दुसऱ्या बाजूला महापालिकेच्या नियोजन शून्य तसेच ते पुढे म्हणाले.

### प्रशासनाविरोधात घोषणाबाजी

येत्या आठ दिवसात मैदान सुरू न झाल्यास आम्ही महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांच्या दालनात क्रिकेट खेळू असा इशारा देखील यावेळी त्यांनी दिला.पुणे शहरातील कात्रज भागातील सुखसागरनगर येथील हभप पुंडलिक टिळेकर मैदान सुरू झालेच पाहिजे,या मागणीसाठी मनसे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या नेतृत्वाखाली पुणे महानगरपालिकेमध्ये क्रिकेट खेळून आंदोलन करण्यात आले.

## रस्ता अडथळा करणारी अतिक्रमणे हटवली

# चिखली-तळवडेतील वाहतूक सक्षमीकरण!

### पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाची कारवाई; सुमारे 39 हजार 600 चौरस मीटर क्षेत्र ताब्यात

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली चौक ते सोनावणे वस्ती आणि देहू आळंदी रस्ता ते सोनावणे वस्ती चौक या रस्त्यांवर अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईत दोन्ही रस्त्यांवरील सुमारे ३९ हजार ६०० चौरस मीटर क्षेत्र रस्ता रुंदीकरणासाठी महापालिकेच्या वतीने ताब्यात घेण्यात आले.**







पहिल्या टप्प्यात चिखली चौक ते सोनवणे वस्ती या २४ मीटर रुंदीच्या डीपी रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले. या मोहिमेत एकूण २ हजार ५५० मीटर लांबीच्या रस्त्यावरील ३० हजार ६०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. तर दुसऱ्या टप्प्यात चिखली ते देहू-आळंदी रस्ता ते सोनवणे वस्ती चौक या ३० मीटर रुंदीच्या डीपी रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले. यामुळे १ हजार ३६० मीटर लांबीचा रस्ता मोकळा होऊन ९ हजार चौरस मीटर सार्वजनिक जागा मोकळी झाली. तसेच १७ मार्चपर्यंत ही कारवाई सुरूच राहणार असून यामुळे पुढील काही दिवसांत रस्ते विकासाच्या कामांना गती मिळणार आहे.

क्षेत्रीय अधिकारी श्रीकांत कोळप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान कार्यकारी अभियंता विजय वायकर, उप अभियंता संजय जाधव, ८ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, २ विद्युत अभियंता, २ विद्युत टेक्निशियन, बांधकाम परवानगी विभागाचे २ उपअभियंता, २ उप पोलीस निरीक्षक, ९ पोलीस कर्मचारी, ५८ महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान तसेच अतिक्रमण कारवाई पथक उपस्थित होते. याशिवाय, ६ पोकलेन आणि ६ जेसीबी निष्कासनाच्या कारवाईसाठी वापरण्यात आले.

> “चिखली व तळवडे भागात झपाट्याने शहरीकरण होत असल्याने वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या भागात नियोजित पायाभूत सुविधा निर्माण करून विकासाला चालना देण्यासाठी आणि नागरिकांसाठी सुलभ वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. अतिक्रमण हटविणे हा त्यासाठीचा महत्त्वाचा टप्पा असून यासाठी नागरिकांचे सहकार्य देखील महत्वाचे आहे.
>
> –शेखर सिंह,
> आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड

#### अतिक्रमण हटविण्यात आलेले रस्ते

– चिखली व तळवडे : २४ मीटर व ३० मीटर रुंदीचा डीपी रस्ता
- एकूण क्षेत्र: ३९,६०० चौरस मीटर
- विकसित होणाऱ्या रस्त्याची लांबी: ३,९१० मीटर

---

## औंध जिल्हा रुग्णालय कर्मचाऱ्यांसाठी नवीन निवासी इमारत

### आमदार शंकर जगताप यांनी केली अधिवेशनात मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभाग घेतला. यावेळी त्यांनी पिंपरी-चिंचवड शहराशी संबंधित तीन महत्त्वाच्या मागण्यांसाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्याची मागणी केली. यामध्ये औंध जिल्हा रुग्णालय कर्मचाऱ्यांसाठी नवीन निवासी इमारतींची मागणी मुख्यत्वे करण्यात आली आहे.**






औंध येथील जिल्हा रुग्णालयाच्या जुन्या सांगवी परिसरातील शासकीय निवासी इमारती सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत आहेत. कर्मचाऱ्यांनी त्यातील दैनंदिन समस्या लक्षात घेता या इमारती रिकाम्या केल्या असून, त्यामुळे त्या जागी असामाजिक तत्वांचा वावर वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार जगताप यांनी या जीर्ण इमारती त्वरित पाडून, कर्मचाऱ्यांसाठी नवीन आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज निवासी इमारती बांधण्याची गरज अधोरेखित केली.

याशिवाय सांगवी परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) वसाहतीतील शासकीय निवासस्थाने देखील अत्यंत मोडकळीस आली आहेत. त्यामुळे येथील निवासी सुविधा सुधारण्यासाठी या इमारतींचे परीक्षण करून नव्याने निवासी इमारत बांधण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याची मागणीही त्यांनी केली. याशिवाय मोशी आरटीओ येथील इमारतीमध्येही जागा कमी पडत असून त्या अनुषंगाने समस्ये कडे लक्ष देण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे.

#### आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

महाराष्ट्र शासनाने आमदार स्थानिक विकास निधीचा उपयोग करण्यास ‘ब’ दर्जा असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना मंजुरी दिली आहे. आमदार शंकर जगताप यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे अनेक गृहनिर्माण संस्था पायाभूत सुविधांसाठी निधीचा लाभ घेऊ शकतील. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने ४ मार्च २०२५ रोजी यासंदर्भात शासन शुद्धीपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांना पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. रस्ते, पाणीपुरवठा, जलनिःसारण आणि इतर मूलभूत सुविधा सुधारण्यास मदत होईल. आमदार शंकर जगताप यांच्या प्रयत्नांचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे. या निर्णयासंबंधी अधिक माहिती व संपूर्ण शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### वासनेचे प्राबल्य.

माझ्या निरूपणाचा तुम्हांस विसर पडतो म्हणूनच बरे आहे. एखादी गोष्ट चांगली आहे आणि ती मिळाली तर सुखप्रद होईल ह्या गोष्टीची आठवण असूनही आपण ती मिळविण्यासाठी प्रयत्न करीत नाही हे अगदी अयोग्य आहे. हे पापच आहे. जर आपल्याला समजलेच नाही तर ते न करण्यात पाप नाही, परंतु समजूनही न करण्यात अत्यंत पाप आहे. खरे म्हणजे, प्रयत्न करणे हे आपल्या हातात आहे. आपण ऐकतो की, अंतकाळी जी मती तीच गती. मृत्युसमयी जशी वासना धरावी त्याप्रमाणे आपल्याला पुनर्जन्म प्राप्त होतो; तेव्हा वासनेतच आपला जन्म आणि वासनेतच आपला अंत, असे असताना तिला दूर कशी करता येईल ? एखादा मनुष्य काळा असेल तर त्याला आपले काळेपण काही घालवता येत नाही; त्याप्रमाणे वासना असणे हा मनुष्याचा एक सहज-गुण आहे, तो त्याला पालटता येत नाही. तर मग आम्हाला वासनेतून कधीच मुक्त होता येणार नाही का ? मनुष्याच्या ठिकाणी इतर प्राणिमात्रांपेक्षा जर काही वेगळे असेल तर चांगले काय आणि वाईट काय हे कळण्याची बुद्धी. आपण कळून सवरूनही वासनेला, अहंपणाला आधार देतो, इथेच आपले चुकते. आपला अहंपणा इतका खोल गेलेला आहे की, आपल्याला हे सर्व माझेच वाटते : माझी बायको, माझी मुले, माझे घर. माझे माझे म्हणून किती सांगावे ! त्या माझेपणामुळेच अहंभाव वाढीला लागून, सर्व काही आपल्या मनाजोगते, आपल्याला सुख देणारे, हवेसे वाटू लागते आणि दुःख अगदी नकोसे वाटते. अर्थात् जगात कोणालाच नुसते सुख मिळत नाही. असे असूनही अहंपणाला बळी पडून सुखाच्या लालचीने मनुष्य मरेपर्यंत बरीवाईट कृत्ये करीत असतो, आणि त्याप्रमाणे त्याची वासना बनत जाते. वासना म्हणजे अभिमान, म्हणजेच मीपणा. अशा रीतीने अहंपणाच जर वासनेचे मूळ अधिष्ठान आहे, तर तो नको का घालवायला? खरोखरच, मनुष्याचा अहंपणा इतका खोल मुरलेला आहे की, त्याचे निर्मूलन करायला तसेच सूक्ष्म अस्त्र पाहिजे. नामाइतके प्रभावी आणि सूक्ष्म अस्त्र दुसरे कोणतेच नाही. ते परमेश्वराच्या अगदी जवळचे आहे. परंतु एवढे असूनही आपण ते आवडीने, निष्ठेने घेत नाही. आम्हांला सर्व काही समजते, परंतु नामस्मरण करण्याचा आळस आपल्यात भरलेला आहे;पण आपण मागितलेली वस्तू भगवंताने दिली नाही तर ती देणे आपल्या हिताचे नव्हते असे खरे मनापासून वाटावे. ही भावना वाढण्यासाठी, भगवंत दाता आहे असे लक्षात ठेवून शक्य तितके त्याचे नामस्मरण करावे.

बोधवचनः- जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला.

# नवा कोरा राजकीय चित्रपट, नैतिकतेची ऐशी की तैसी sss!



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी राजीनामा देऊन एका अर्थाने मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खूनप्रकरणी नामानिराळे होण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्यक्षात या खूनप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांचा 'उजवा हात' होता, हे आता पाळण्यातील मुलालाही माहीत झाले आहे. त्यामुळे दगडाखाली अडकलेले हात काढण्याचा जर धनंजय मुंडे यांचा प्रयत्न असेल, तर तो दगडच आता अंगावर पडण्याची भीती निर्माण झाली आहे. आज ना उद्या, धनंजय मुंडे यांच्यावरच हे गंडांतर येणार, हे वेगळे सांगायला नको !**



### 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा..'

एखाद्या व्यक्तीला पाठीशी घातले जात असेल, तर 'इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' म्हणून त्याच्याकडे पाहिले जात असते याचाच अर्थ ज्या गुन्हेगाराला पाठीशी घातले जाते, तो जाळ्यात अडकतो आणि जो पाठीशी घालतो, त्याचा बाजारही उठतो! वाल्मीक कराड तर या प्रकरणात अडकला आहेच. 'नैतिक आणि अनैतिक राजीनामा या विषयावर सत्ताधारी तसेच विरोधक दोन्ही पक्षाचे नेते जोरदार एकमेकांवर हल्लाबोल करत आहेत.

### नैतिक, अनैतिकता लागू पडत नाही..

धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराडची गुंड गँग नैतिकतेच्या मोजमापात बसत नाही, हे नक्की झाले आहे. आता मंत्रीद्वय म्हणजे माणिकराव कोकाटे आणि जयकुमार गोरे यांच्या नीतिमत्तेवर, वर्तणुकीवर उहापोह होणार आहे. कोकाटे याना न्यायालयाने दिलासा दिला असला तरी हे महाशय निर्दोष मुक्त नाहीत. त्यांच्या शिक्षेला स्थगिती मिळाली आहे. याचा अर्थ ते दोषी आहेतच. मात्र, त्या विरोधात अपील करण्याची त्यांना संधी मिळाली.

### दिरंगाई म्हणजे न्याय नाकारणे!

हे सर्व प्रकार पाहता आणि सुनावलेली शिक्षा विचारात घेता कोकाटे यांनी ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे. मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका मिळवण्यासाठी जी लबाडी, कागदपत्रात खोटेपणा आणि नियतीत चोरटेपणा कोकाटे यांनी दाखवला होता, तो न्यायालयाने, प्रशासनाने त्यांनाच उघड करून दाखवला आहे. मुळात हा खटला तब्बल २७ वर्षे सुरु होता. दिरंगाईने मिळालेला न्याय हा अन्यायच असतो. ज्यांनी त्यांच्या विरोधात खटला लढला, त्यांना हा मिळेलला न्याय पूर्वीच मिळायला हवा होता.

...आणि जर तो मिळाला असता तर कोकाटे आज कदाचित राजकारणात दिसले नसते, अथवा योग्य पद्धतीने वागताना दिसले असते. मात्र, न्यायालयाच्या निकाल देण्याच्या दिरंगाईने ही मंडळी आज थेट विधिमंडळात कायदे करताना दिसतात सरकारी यंत्रणा वापरताना दिसतात. याला नैतिकता म्हणतात का ?

आता पुन्हा विषय येतो, तो नैतिकतेचा..कोकाटे यांनी जनलज्जेस्तव राजीनामा देणे आणि निकाल लागेपर्यंत आमदार म्हणून कामकाज न पाहणे अपेक्षित आहे. तांत्रिक बाबींवर खेळ करत नामदारकी टिकवणे, ही नैतिकता नाही. तसेच जी मंडळी कोकाटे आणि गोरे यांना नीतिमत्तेचे धडे देतात, त्यांनीही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. ते देखील नैतिकतेच्या कसोटीवर उत्तीर्ण होत नाहीत !

### नैतिकतेची ऐशी-तैशी

गोरे यांच्यावर 'उबाठा' गटाचे नेते संजय राऊत यांनी आगपाखड केली. महिलेचा विनयभंग केला असे सांगितले. गोरे यांच्या बाबतीत न्यायालयाने या खटल्यावर निकाल दिला आहे. गोरे निर्दोष आहेत, असा निकाल दिला आहे, असे गोरे यांचे सांगणे आहे. जर त्यांनी गैरवर्तन केले असेल आणि पीडितेला न्याय मिळाला असे वाटत नसेल तर त्यांना पुढील न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. तरी अशा परिस्थितीत नामदारकी भूषवणे त्याला नैतिकता म्हणतात का ?

### महिलेला शिव्या देण्याची नैतिकता

संजय राऊत दूरध्वनीवरून एका महिलेला ज्या शिवराळ भाषेत बोलतात, त्याला नैतिकता म्हणतात का ? कंगना राणावत याना 'उखाड लिया' म्हणत त्यांचे घर उद्ध्वस्त करतात, त्याला नैतिकता म्हणतात का ? न्यायालयाने या बाबतचा निकाल राणावत यांच्या बाजूने दिला, त्या लोकसभेत निवडून आल्या. राऊत मागच्या दाराने..ज्यांना गद्दार म्हणतात, त्यांच्या मतावर निवडून गेलेत. याला नैतिकता म्हणतात का ?

मुंडेंच्या ऐवजी छगन भुजबळ मंत्री होणार असे पसरवले जाते. भुजबळही जामिनावर आहेत. मोठ्या घोटाळ्याचे आरोपी आहेत. तरी त्यांना मंत्रिपद द्यायचे त्याला नैतिकता म्हणतात का ? की करमुसे यांना घरी उचलून आणतात आणि मनसोक्त बडवतात, त्यांच्यावर गुन्हा नोंद होतो, ते जितेंद्र आव्हाड कायदा, सुव्यवस्थेच्या बाजूने गळा काढतात त्याला त्याला नैतिकता म्हणतात का ?

### नैतिकतेची उदाहरणेच उदाहरणे

नवाब मलिक आरोग्याचे कारण देऊन तुरुंगातून बाहेर पडतात आणि निवडणूक लढवतात, प्रचार सभा घेतात त्याला नैतिकता म्हणतात का ? अशा अनेक नैतिकतेचे नमुने विधानसभा आणि विधान परिषदेत आहेत, त्यांच्या वर्तनाला त्याला नैतिकता म्हणतात का ? एकूण सध्याचे चित्र प्रत्येकाने आपली नैतिकता प्रयागराज च्या 'महाकुंभ'मध्ये बुडवलेली आहे, असेच आहे. नैतिकतेची उदाहरणे देता येतील तेवढी थोडीच आहेत ! थोडक्यात काय सध्या 'नैतिकतेची ऐशी - तैशी !' म्हणत तुम्ही आम्ही ऊर बडवत बसणे, एवढेच आपल्या हाती आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘छावा’प्रमाणे मीही अत्याचार भोगले!

## ‘पक्ष’ बदलला नाही, शिवसेनेच्या (ठाकरे) आमदार अनिल परब यांचे विधान

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**सध्या छावा चित्रपटाचा चांगलाच बोलबोला आहे. या चित्रपटामुळे छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाबद्दल अनेकांना कुतूहल निर्माण झाले आहे. तसेच औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांवर केलेल्या अत्याचाराबद्दली अनेकांनी हळहळ व्यक्त केली. विधानपरिषेदत आज राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा होत असताना शिवसेनेचे (ठाकरे) नेते, आमदार अनिल परब यांनी छावा चित्रपटाचा विषय काढला. “छत्रपती संभाजी महाराजांवर कसे अत्याचार झाले, तरी त्यांनी धर्म बदलला नाही. तसेच माझ्यावरही तुरुंगात अत्याचार झाले, पण मी पक्ष बदलला नाही”, असे विधान अनिल परब यांनी केले.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधील सहकाऱ्यांना घेऊन नुकताच छावा चित्रपट पाहिला. पण राज्यपालांच्या अभिभाषणात छत्रपती संभाजी महाराजांचा उल्लेख आढळला नाही. तसेच तुम्ही छावा बघता, तर मला पण बघा, असे विधान शिवसेनेचे (ठाकरे) नेते अनिल परब यांनी केले. विधानपरिषदेत बोलताना ते म्हणाले, “धर्म बदलण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांचा छळ झाला. माझ्यावर पक्ष बदलण्यासाठी छळ झाला. मी सगळे भोगले, पण पक्ष बदलला नाही. बाकी सर्वांना जरा हूल दिली की, लगेच गेले पक्ष सोडून.” अनिल परब म्हणाले, “छत्रपती संभाजी महाराजांबद्दल सत्ताधारी बाकावरून बरेच बोलले गेले. धर्म बदलण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला. त्यांचे डोळे काढले, हात-पाय छाटले. छत्रपती संभाजी महाराजांनी शेवटपर्यंत धर्म बदलला नाही. ते आपल्या मतावर ठाम राहिले. छळ झाला तरी दबावाला बळी पडले नाही. छत्रपती संभाजी महाराजांचा वारसा मी चालवला आहे. पक्ष बदलण्यासाठी माझा छळ झाला. ईडीची नोटीस, सीबीआय, प्राप्तिकर विभाग अशी विविध कारवाई माझ्यावर करण्यात आली.” मी पक्ष बदलला नाही, याचा मला अभिमान वाटतो. जे पक्ष बदलून गेले, ते आता आम्हाला छत्रपती संभाजी महाराजांचा वारसा सांगत आहे, अशीही टीका अनिल परब यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अभिभाषणात लिहिले की, त्यांचा मान-सन्मान राखला जाईल. पण प्रशांत कोरटकर आणि राहूल सोलापूरकर हे महाराजांचा अपमान करतात, तेव्हा त्यांचा विरोध करण्याची सरकारची हिंमत होत नाही. पण राज्यपालांना चुकीची माहिती देण्याचे काम सरकार करत आहे, असाही आरोप अनिल परब यांनी केला. “अनिल परब यांनी स्वतःची तुलना छत्रपती संभाजी महाराजांशी केली. पण त्यांना मी सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज माझ्या हृदयात आहेत. म्हणूनच संगमेश्वर येथील सरदेसाई वाडा अधिग्रहीत करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे”, असे विधान भाजपाचे आमदार अमित गोरखे यांनी आपल्या विधानपरिषदेतील भाषणात केले. तसेच भाजपाकडून शुक्रवारी (७ मार्च) अनिल परब यांच्या विधानाच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधील सहकाऱ्यांना घेऊन नुकताच छावा चित्रपट पाहिला. पण राज्यपालांच्या अभिभाषणात छत्रपती संभाजी महाराजांचा उल्लेख आढळला नाही. तसेच तुम्ही छावा बघता, तर मला पण बघा, असे विधान शिवसेनेचे (ठाकरे) नेते अनिल परब यांनी केले. विधानपरिषदेत बोलताना ते म्हणाले, “धर्म बदलण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांचा छळ झाला. माझ्यावर पक्ष बदलण्यासाठी छळ झाला. मी सगळे भोगले, पण पक्ष बदलला नाही. बाकी सर्वांना जरा हूल दिली की, लगेच गेले पक्ष सोडून.” अनिल परब म्हणाले, “छत्रपती संभाजी महाराजांबद्दल सत्ताधारी बाकावरून बरेच बोलले गेले. धर्म बदलण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला. त्यांचे डोळे काढले, हात-पाय छाटले. छत्रपती संभाजी महाराजांनी शेवटपर्यंत धर्म बदलला नाही. ते आपल्या मतावर ठाम राहिले.

### हे महाराजांचा अपमान करतात

छळ झाला तरी दबावाला बळी पडले नाही. छत्रपती संभाजी महाराजांचा वारसा मी चालवला आहे. पक्ष बदलण्यासाठी माझा छळ झाला. ईडीची नोटीस, सीबीआय, प्राप्तिकर विभाग अशी विविध कारवाई माझ्यावर करण्यात आली.” मी पक्ष बदलला नाही, याचा मला अभिमान वाटतो. जे पक्ष बदलून गेले, ते आता आम्हाला छत्रपती संभाजी महाराजांचा वारसा सांगत आहे, अशीही टीका अनिल परब यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अभिभाषणात लिहिले की, त्यांचा मान-सन्मान राखला जाईल. पण प्रशांत कोरटकर आणि राहूल सोलापूरकर हे महाराजांचा अपमान करतात.

# भय्याजी जोशींच्या विधानावर राज यांचे टीकास्त्र

## राज ठाकरेंनी भय्याजी जोशींच्या वक्तव्यावर परखड शब्दांत टीका

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते व माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी केलेल्या एका विधानाची सध्या जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. भय्याजी जोशी यांनी मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना मराठी भाषेबाबत एक विधान केलं. त्यावरून राजकीय वर्तुळात वाद निर्माण झाला असून थेट विधिमंडळ अधिवेशनात याचे पडसाद उमटले. भय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्यावर विरोधकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत असताना मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी या विधानावर सविस्तर भूमिका मांडली आहे.**



राज ठाकरेंनी भय्याजी जोशींच्या विधानाबाबत एक्स अकाऊंटवर सविस्तर पोस्ट शेअर केली आहे. यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, भाषावार प्रांतरचना या बाबींचा उल्लेख करतानाच भय्याजी जोशींच्या या विधानामागे राजकीय कारण दडल्याचाही उल्लेख राज ठाकरेंनी केला आहे. “राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी मुंबईत राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी येणं गरजेचं नाही, असं विधान केल्याच ऐकलं. देशाची झालेली भाषावार प्रांत रचना, त्यात मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून १०६ हुतात्म्यांनी दिलेलं बलिदान या सगळ्याबद्दल भय्याजी जोशींना माहीत नसेल असं अजिबात नाही. पण कायम महाराष्ट्राबद्दलच किंवा मराठीबद्दलची अशी विधाने करायची याचं कारण काय? भय्याजी जोशींनी असंच विधान बंगळुरू किंवा चेन्नईत करून दाखवावं”, असं राज ठाकरेंनी पोस्टमध्ये म्हटलं आहे. “भय्याजी जोशींच्या या विधानाशी महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्ष सहमत आहे का?” असा सवाल राज ठाकरेंनी पोस्टमध्ये केला आहे. “उद्या समजा संघाच्या सोडाच इतर कुठल्याही जबाबदार व्यक्तीने असं विधान जर इतर राज्यात केलं असतं तर त्या राज्यातील सर्व पक्षांनी निषेध नोंदवला असता. भारतीय जनता पक्ष महाराष्ट्राच्या अस्मितेला प्राधान्य देऊन निषेध नोंदवणार आहे का?” असाही प्रश्न राज ठाकरेंनी सत्ताधारी भाजपाला केला आहेचाललेला विकास आणि त्यामागील राजकीय हेतू हे जोशींच्या वक्तव्यातून व्यक्त होताना दिसत आहेत . हे काय चाललंय हे न समजण्याइतकी मराठी जनता दुधखुळी नाही हे जोशींनी लक्षात घ्यावं! हे राजकारण करताना आपण स्वतः मराठी आहोत याचं भानही जोशींनी सोडावं?” अशा शब्दांत राज ठाकरेंनी भय्याजी जोशींना जाब विचारला आहे.

### काय आहे राज ठाकरेंची पोस्ट?

“आत्ताच कोल्डप्ले नावाचा वाद्यवृंद मुंबईत येऊन गेला त्या ब्रिटिश माणसालाही मुंबईत कोणती भाषा चालते आणि ही मुंबई कोणाची आहे हे समजते तर मग जोशी बुवांना हे समजू नये? या असल्या काड्या घालून (अर्थात राजकीय हेतू असल्याशिवाय हे होणे नाही) नवा संघर्ष आपण उदयाला आणत आहात हे जरूर ध्यानात ठेवावे!

# उत्तराखंडमध्ये बारमाही पर्यटन व्हावे!

## पंतप्रधानांची अपेक्षा; अर्थव्यवस्थेला चालना मिळणार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उत्तराखंडमधील बारमाही पर्यटनाचा पुरस्कार करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सुंदर डोंगराळ राज्यात कोणताही 'ऑफ सीझन' नसावा आणि प्रत्येक हंगाम 'ऑन सीझन' असावा ज्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात मजबूत होईल, असे प्रतिपादन केले. मुखबा येथील गंगा नदीसमोर प्रार्थना केल्यानंतर हर्सिलमधील एका जाहीर सभेला ते संबोधित करीत होते. पर्यटक जर हिवाळ्यात राज्यात आले तर त्यांना उत्तराखंडची खरी आभा बघायला मिळेल, असे ते म्हणाले. कार्यक्रमाला मुख्यमंत्री पुष्कर धामी उपस्थित होते.**



कार्यक्रमाला संबोधित करताना त्यांनी त्यांना जाणवलेल्या एका भावनेचा उल्लेखही केला. गंगा मातेने त्यांना मुलासारखी मिठी मारली होती आणि त्यामुळेच मुखवा येथे आलो असल्याचे पंतप्रधान म्हणाले. चमोली जिल्ह्यातील माना गावात नुकत्याच झालेल्या हिमस्खलनात बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन कॅम्पमधील आठ कामगारांचा मृत्यू झाल्याबद्दलही त्यांनी दु:खही व्यक्त केले. पर्यटनाबरोबरच रोजगारही सुरू होईल. स्थानिक तरुणांना वर्षभर संधीही मिळेल.

एक '३६०-डिग्री दृष्टिकोन' आवश्यक आहे. सध्या मार्च, एप्रिल आणि जूनमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक पर्वतावर येतात, परंतु त्यानंतर त्यांची संख्या कमी होते. बारमाही पर्यटनामुळे उत्तराखंडची आर्थिक क्षमता वाढण्यास मदत होईल.१९६२ मध्ये जेव्हा चीनने भारतावर हल्ला केला तेव्हा सीमावर्ती गाव जाजुंग रिकामे करण्यात आले. आता त्याचे पुनर्वसन आणि विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे पंतप्रधान म्हणाले. दरम्यान, केदारनाथ आणि हेमकुंड साहिबसाठी कॅबिनेट समितीने मंजूर केलेल्या दोन प्रमुख रोपवे प्रकल्पांना केदारनाथ मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी आठ-नऊ तासांचा प्रवास कमी होईल, अशी माहितीही त्यांनी दिली.राज्यातील हिवाळी पर्यटनासाठी गढवाली भाषेत 'घाम तापो पर्यटन' (सूर्यस्नान पर्यटन) चा संदेश देत हिवाळ्यात, जेव्हा देशाच्या मोठ्या भागावर धुके असते, तेव्हा पर्वत सूर्यप्रकाशाचा आनंद घेतात, असे प्रतिपादन केले. बारमाही किंवा ३६५ दिवसांच्या पर्यटनाला चालना देण्याच्या राज्य सरकारच्या दृष्टिकोनाचे त्यांनी यावेळी कौतुकही केले. तसेच केदारनाथ मंदिरापर्यंत होत असलेल्या विकासकामांची माहितीही त्यांनी दिली.नवी दिल्ली : काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी दावा केला की, 'नमामि गंगे' योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या निधीपैकी ५५ टक्के रक्कमही खर्च झाली नाही, हाच पुरावा आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गंगा स्वच्छतेसाठी दिलेल्या हमीचा विसर पडला आणि स्वच्छतेच्या नावाखाली फसवणूक केली, असा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. आपल्या आरोपांच्या पुष्ट्यर्थ त्यांनी संसदेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांचा दाखलाही दिला. या योजनेसाठी मार्च २०२६ पर्यंत ४२,५०० कोटी रुपये वापरायचे होते; परंतु डिसेंबर २०२४ पर्यंत केवळ १९,७२१ कोटी रुपयेच खर्च झाले असल्याचे खरगे म्हणाले. या निधीतील ५३ टक्के रक्कम सरकारी उपक्रमातून दान करण्यात आली आहे, असा दावा खरगे यांनी केला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी उत्तरकाशी जिल्ह्यातील गंगा देवीचे हिवाळी निवासस्थान असलेल्या मुखवा मंदिरात वैदिक मंत्रोच्चारात पूजा केली. पारंपरिक वेशभूषा केलेल्या स्थानिकांनी पंतप्रधानांचे जोरदार स्वागत केले. यावेळी त्यांनी आजूबाजूच्या बर्फाच्छादित शिखरांचे सकाळचे दृश्यही न्याहाळले. मुखवा हे गंगा देवीला समर्पित गंगोत्री मंदिराच्या वाटेवर वसलेले गाव आहे. दरवर्षी हिवाळ्यासाठी दरवाजे बंद झाल्यानंतर देवीची मूर्ती गंगोत्री धाम येथून मुखवा मंदिरात नेली जाते.कार्यक्रमाला संबोधित करताना त्यांनी त्यांना जाणवलेल्या एका भावनेचा उल्लेखही केला. गंगा मातेने त्यांना मुलासारखी मिठी मारली होती आणि त्यामुळेच मुखवा येथे आलो असल्याचे पंतप्रधान म्हणाले. चमोली जिल्ह्यातील माना गावात नुकत्याच झालेल्या हिमस्खलनात बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन कॅम्पमधील आठ कामगारांचा मृत्यू झाल्याबद्दलही त्यांनी दु:खही व्यक्त केले. पर्यटनाबरोबरच रोजगारही सुरू होईल. स्थानिक तरुणांना वर्षभर संधीही मिळेल. एक '३६०-डिग्री दृष्टिकोन' आवश्यक आहे.

### गंगा देवीची पूजा

सध्या मार्च, एप्रिल आणि जूनमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक पर्वतावर येतात, परंतु त्यानंतर त्यांची संख्या कमी होते. बारमाही पर्यटनामुळे उत्तराखंडची आर्थिक क्षमता वाढण्यास मदत होईल.१९६२ मध्ये जेव्हा चीनने भारतावर हल्ला केला तेव्हा सीमावर्ती गाव जाजुंग रिकामे करण्यात आले.

# सर्व ओलिसांना सोडा, अन्यथा... : डोनाल्ड ट्रम्प

## सर्वांचे मृतदेहही परत करा: 'हमास'शी प्रथमच अमेरिकेचा थेट संवाद

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हमास संघटनेला इस्रायलचे उर्वरित सर्व ओलिस सोडण्यासाठी शेवटचा इशारा दिला. 'हमास'शी थेट चर्चा करण्यासाठी ट्रम्प यांनी आपल्या अधिकाऱ्यांना पाठविले आहे. त्या पार्श्वभूमीवर अतिशय निर्वाणीचा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.**



'व्हाइट हाउस'मध्ये ट्रम्प यांनी 'हमास'ने सोडलेल्या आठ ओलिसांशी संवाद साधला. त्यानंतर ट्रम्प म्हणाले, 'इस्रायलला त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी सर्व काही पाठवीत आहे.' 'हमास'ला उद्देशून ट्रम्प म्हणाले, 'सर्व ओलिसांची आता, ताबडतोब सुटका करा. नंतर नाही.

तसेच, तुम्ही ज्यांची हत्या केली आहे, त्या सर्वांचे मृतदेहही ताबडतोब परत करा. अन्यथा, तुमच्यासाठी आता सारे संपलेले असेल. केवळ विकृत लोक मृतदेह जवळ ठेवतात आणि तुम्ही विकृत आहात.'अमेरिकी अधिकारी 'हमास'बरोबर चर्चा करीत असल्याचे व्हाइट हाउसने बुधवारी सांगितले. त्यानंतर ट्रम्प यांनी तीव्र शब्दांत 'हमास'ला इशारा दिला. दहशतवादी गटाशी थेट चर्चा न करण्याच्या अमेरिकेच्या आतापर्यंतच्या धोरणाला ट्रम्प यांनी फाटा दिला. कतारमध्ये दोहा येथे ही चर्चा होत आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने १९९७ मध्ये 'हमास'ला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले होते. तेव्हापासून हमास आणि अमेरिकेमधील ज्ञात असलेली ही पहिलीवहिलीच चर्चा आहे. चर्चेसंबंधी अधिक तपशील देण्यास व्हाइट हाउसच्या माध्यम सचिव कॅरोलिन लिएव्हिट यांनी नकार दिला.

मात्र, अध्यक्ष ट्रम्प यांनी शिष्टमंडळातील प्रत्येकाला कुणाशीही बोलण्याचे अधिकार दिले असल्याचे त्यांनी सांगितले. इजिप्त आणि कतार यामध्ये मध्यस्थाची भूमिका बजावत आहेत.

### मेक्सिकोवरील करसंकट तूर्तास टळले

डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिकोतील बहुतांश वस्तूंवरील २५ टक्के कराचा निर्णय एक महिन्यासाठी पुढे ढकलला आहे. ट्रम्प यांचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी कॅनडा आणि मेक्सिको या दोन्ही देशांवरील कर 'कदाचित' पुढे ढकलले जातील असे संकेत दिल्यानंतर ट्रम्प यांनी यासंदर्भात घोषणा केली.

# प्रसिद्ध गायकाने ए आर रेहमान यांच्या कार्यपद्धतीवर केली टीका

गायक अभिजीत भट्टाचार्य यांनी ऑस्कर विजेते संगीतकार ए आर रेहमान यांच्याबरोबर काम करताना त्यांना आलेल्या अनुभवावर भाष्य केले आहे. अभिजीत यांनी रेहमान यांच्याबरोबर फक्त एकाच गाण्यावर काम केले आहे. 'ऐ नाजनीन सुनो ना' या गाण्यासाठी त्यांनी एकत्र काम केले आहे. अभिजीत यांनी ए आर रेहमान यांच्या रात्री काम करण्याच्या सवयीवरही भाष्य केले आहे. 'बॉलीवूड ठिकाणा'ला दिलेल्या मुलाखतीत, अभिजीत यांना त्यांनी ए आर रेहमान यांच्याबरोबर फक्त एकदाच का काम केले याबद्दल विचारले . त्यावर ते म्हणाले, "त्या काळात मला सर्व मोठ्या संगीतकारांकडून फोन येत होते. अनु मलिक, आनंद-मिलिंद, जतिन-ललित सर्वजण फोन करत होते. मी सतत डबिंगमध्ये व्यस्त होतो. मी रेहमान यांना भेटण्यासाठी गेलो आणि मला हॉटेलमध्ये थांबून ठेवण्यात आले."ते पुढे म्हणाले, "मी ठरवले की मी थांबणार नाही आणि मी सकाळी रेकॉर्डिंग करेन. मी घरी गेल्यानंतर मला रात्री २ वाजता स्टुडिओतून फोन आला आणि त्यांनी मला गायनासाठी बोलावले. मी त्यांना सांगितले की, मी झोपलो आहे. मी सकाळी गेलो, पण तिथे ते नव्हते. त्यांना नियमित वेळेत काम करण्याची सवय नाही. मला व्यवस्थित पद्धतीने काम करायला आवडते. आता क्रिएटिव्हिटीच्या नावाखाली जर तुम्ही म्हणाल की रात्री ३:३३ वाजता रेकॉर्डिंग होईल, तर मला हे पटत नाही."अभिजीत यांनी सांगितले की, "त्या दिवशी स्टुडिओत रेहमान यांचे सहाय्यक होते आणि तेच सगळं काम बघत होते. माझ्या रूममधील एअर-कंडिशनिंगमुळे मला सर्दी झाली होती. पण त्यांनी आग्रह केला की मी गाऊन दाखवावे. मी अनेक सुपरफ्लॉप चित्रपटांसाठी हिट गाणी गायली आहेत आणि हे त्यापैकी एक होतं. कोणीही तो चित्रपट पाहिला नाही. गाणं रेहमानचं आहे असं सांगून त्यांनी रेहमान यांना श्रेय दिले." अभिजीत पुढे म्हणाले, "मी रेहमान यांना विचारत राहिलो, पण मला ठाम उत्तर मिळालं नाही. एखादा कलाकार अशा गोष्टींमुळे मोठा किंवा लहान होत नाही... मला सांगण्यात आलं की, मी त्यांची वाट बघून त्यांना भेटून नंतर जावे . पण मी त्यांना सांगितले की, माझी आधीची काही कामे आहेत."

## सोनूला दिली होती 'दबंग 2'ची ऑफर

सोनू सूद बॉलीवूडमधील लोकप्रिय स्टार आहे. त्याने हिरोपेक्षा खलनायकाच्या भूमिकेतून चाहत्यांची मने जिंकली आहेत. २०१० मध्ये रिलीज झालेल्या सलमान खानच्या 'दबंग' चित्रपटात सोनू सूदने छेदी सिंहची भूमिका साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला होता. अलीकडेच सोनू सूदने एका मुलाखतीत त्याला 'दबंग २' मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका ऑफर झाली होती, पण त्याने ती नाकारली असे सांगितले आहे. 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीत सोनू सूद म्हणाला, "सलमान आणि अरबाज माझ्या कुटुंबातील सदस्यासारखे आहेत. त्यांनी मला 'दबंग २'मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका साकारण्यासाठी बोलावलं होतं, पण मी नकार दिला. कारण मला कोणत्याही प्रकारे ती भूमिका उत्साहित करत नव्हती. मी हे कारण त्यांना सांगितल्यावर त्यांनी "काही हरकत नाही" अशी प्रतिक्रिया दिली. सोनू सूद पुढे म्हणाला की, "'दबंग २'च्या प्रीमियरला सलमान खानने मला बोलावलं होतं आणि मी आनंदाने उपस्थित राहिलो". 'दबंग' चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये छेदी सिंहच्या भावाचा उल्लेख आहे.

## प्रार्थना बेहेरेने मागितली माफी



राज्यभरात आज शिवजयंतीचा जल्लोष पाहायला मिळत आहे. शिवजयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लातूरमधील एका कार्यक्रमात अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. त्यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. लातूरच्या उदगीर येथील एका मॉलच्या उद्घाटनासाठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी उद्घाटनादरम्यान शुभेच्छा देताना सलग चार-पाचवेळा तिने महाराजांचा एकेरी शब्दात उल्लेख केला. त्यामुळे लातूरमधील शिवभक्तांकडून तिचा निषेध करण्यात येत आहे. तसेच अभिनेत्रीच्या स्वागतासाठी लावण्यात आलेले बॅनरदेखील फाडण्यात आले आहेत. तसेच प्रार्थनाने आता माफी मागावी, अशी मागणी शिवप्रेमींकडून करण्यात येत आहे. मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री प्रार्थना बेहेरे लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे एका व्यापारी प्रतिष्ठानच्या कार्यक्रमासाठी आली होती. यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. अभिनेत्रीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. संतप्त झालेल्या शिवप्रेमींनी उदगीर शहरामध्ये अभिनेत्रीचे लागलेले बॅनर फाडत संताप व्यक्त केला. अभिनेत्रीच्या ही बाब लक्षात आल्यानंतर तिने नवा व्हिडीओ बनवून शिवप्रेमींची माफी मागितली आहे.प्रार्थना बेहेरेने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवभक्तांनी नाराजी दर्शवत तिच्या वक्तव्याचा जाहीर निषेध नोंदवला. अभिनेत्रीने जाहीर माफी मागावी अशी मागणी केली जात होती. अशातच आता अभिनेत्रीने एक व्हिडीओ शेअर करत जाहीर माफी मागितली आहे. प्रार्थना बेहेरे म्हणाली आहे,"आज मी उदगीर येथे किसान मॉलच्या उद्घाटनाला आले होते. तिथे आल्यावर माझ्याकडून चुकून काही बोलण्यात आले असेल तर त्या बद्दल मी तुम्हा सर्वांची माफी मागू इच्छिते.

## एक शीख आणि एका हिंदूचे निधन

अमिताभ बच्चन सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. ते अनेकदा सोशल मीडियावर फोटो व व्हिडिओ शेअर करत असतात. आता त्यांनी सोशल मीडियावर केलेली पोस्ट चांगलीच चर्चेत आहे. ही पोस्ट २०२४ मध्ये भारताने गमावलेल्या चार व्यक्तींबद्दल आहे. हा फोटो शेअर करून बिग बी यांनी जे कॅप्शन लिहिले, ते पाहून अनेक युजर्स व्यक्त झाले आहेत. अमिताभ बच्चन यांनी सरत्या वर्षाला निरोप देणारी एक पोस्ट केली. २०२४ मध्ये उद्योगपती रतन टाटा, चित्रपट निर्माते श्याम बेनेगल, तबला वादक झाकीर हुसेन आणि माजी पंतप्रधान मनमोहन सिंग या दिग्गजांचे निधन झाले. व्यंगचित्रकार सतीश आचार्य यांनी या सर्वांवर एक व्यंगचित्र काढलं. ते अमिताभ बच्चन यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केलं.अमिताभ बच्चन यांनी शेअर केलेल्या या व्यंगचित्रात दिवंगत रतन टाटा, चित्रपट निर्माते श्याम बेनेगल, तबला वादक झाकीर हुसैन आणि माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे फोटो आहेत आणि त्यावर २०२४ मध्ये एक पारशी, एक मुस्लीम, एक शीख आणि एका हिंदूचे निधन झाले आणि पूर्ण देश हळहळला. सर्वांनी त्यांचे एक भारतीय म्हणून स्मरण केले, असा मजकूर लिहिलेला आहे. हा फोटो शेअर करत 'हे चित्र सगळं सांगतंय,' असं बिग बींनी लिहिलं. बिग बी यांनी मध्यरात्री तीन वाजता ही पोस्ट शेअर केली. त्यांच्या पोस्टचे लोक खूप कौतुक करत आहेत. आपण सगळे एक आहोत ही प्रेरणा या पोस्टमधून मिळते, अशी कमेंट एका युजरने केली. तर, ही पोस्ट केल्याबद्दल खूप खूप धन्यवाद, असं एका युजरने लिहिलं. तुमच्या या पोस्टमधून लोक काहीतरी बोध घेतील.

## मला धूम्रपान करायला खूप आवडतं: विद्या बालन



आपल्या अप्रतिम अभिनयाच्या जोरावर विद्या बालनने इंडस्ट्रीत स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. टीव्हीपासून सुरुवात करणारी विद्या बॉलीवूडची आघाडीची अभिनेत्री बनली. दाक्षिणात्य अभिनेत्री सिल्क स्मिताची भूमिका तिने 'द डर्टी पिक्चर'मध्ये साकारली होती. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता आणि विद्याला त्यासाठी राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान विद्याला एक व्यसन जडलं होतं.'द डर्टी पिक्चर'नंतर विद्याला धूम्रपान करायची सवय लागली होती. तिने 'अनफिल्टर्ड बाय समदीश' या मुलाखतीत याबाबत माहिती दिली. सुरुवातीला ती ऑनस्क्रीन सिगारेट ओढायला तयार नव्हती, पण चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान तिला सिगारेटचं व्यसन जडलं, असं तिने सांगितलं आहे.विद्या म्हणाली, "या चित्रपटाआधी मी धूम्रपान केलं होतं, मला ते कसं करायचं हे माहित होतं, पण मी धूम्रपान करायचे नाही. पण एखादी भूमिका करताना तुम्ही धूम्रपान करण्याची नक्कल करू शकत नाही. आपल्याकडे धूम्रपान करणाऱ्या स्त्रियांबद्दल एक विशिष्ट समज आहे, त्यामुळे माझ्या चेहऱ्यावर तो संकोच असून चालणार नव्हता. आता महिलांबद्दलचा हा समज खूप कमी झालाय, पण आधी तो खूप होता. 'द डर्टी पिक्चर' नंतर सिगारेटचं व्यसन जडलं आणि मी रोज दोन ते तीन सिगारेट ओढत असे.

# खेळाडू लाइव्ह सामन्यात झोपला!

## सौद शकील झोपल्याने त्याला टाईम आऊट देण्यात आले

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे यजमान असलेल्या पाकिस्तान क्रिकेट संघाची या स्पर्धेत अतिशय खराब कामगिरी पाहायला मिळाली. त्यामुळे मोहम्मद रिझवानच्या नेतृत्वाखालील संघ एकही सामना न जिंकता बाहेर पडला. तेव्हापासून पाकिस्तानच्या खेळाडूंना माजी क्रिकेटपटू आणि जगभरातील दिग्गजांकडून टीकेला सामोरे जावे लागत आहे. यादरम्यानच पाकिस्तानच्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या संघाचा भाग असलेल्या सौद शकीलने अजून एक अशी कामगिरी केली आहे, की पाकिस्तान संघ पुन्हा एकदा चर्चेत आला आहे..**




पाकिस्तान क्रिकेट संघाकडून खेळणाऱ्या सौद शकीलच्या एका कृतीमुळे तो स्वत: आणि पाकिस्तान क्रिकेटला ट्रोल केले जात आहे. सौद शकील चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तान क्रिकेट संघाचा भाग होता. पण सौद शकील आता फलंदाजीला जायचं असतानाही झोपल्याने त्याला टाईम आऊट देण्यात आले, ज्याचा त्याच्या संघाला मोठा फटका बसला.सौद शकीलला प्रेसिडेंट कपमधील एका सामन्यात क्रिझवर जाण्यापूर्वी झोप लागल्याने टाइम-आउट देण्यात आले. शकील प्रेसिडेंट कप ग्रेड 1 प्रथम श्रेणी स्पर्धेत स्टेट बँक ऑफ पाकिस्तानसाठी पाकिस्तान टेलिव्हिजन विरुद्ध पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करणार होता.

पण झोपेमुळे तो नियोजित वेळेत क्रीजवर पोहोचू शकला नाही, त्यामुळे त्याला टाईम आऊट देण्यात आले. मोठी गोष्ट म्हणजे हा आंतरराष्ट्रीय सामना नव्हता. ही पाकिस्तानमधील देशांतर्गत स्पर्धा आहे.सतत विकेट पडल्यानंतर सौद शकील पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला येणार होता, पण तो निर्धारित तीन मिनिटांत क्रिजपर्यंत पोहोचू शकला नाही. पाकिस्तान टेलिव्हिजन संघाचा कर्णधार अमाद बट्टने तातडीने अपील केले आणि पंचांनी ते फेटाळले. रिपोर्टसनुसार शकील झोपला असल्याचे म्हटले आणि वेळेवर फलंदाजीसाठी जाऊ शकला नाही. यासह, तो प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये टाइम आउट होणारा ७वा फलंदाज आणि इतिहासातील पहिला पाकिस्तानी क्रिकेटपटू ठरला आहे.जेव्हा एखादा नवीन फलंदाज संघाची विकेट गेल्यानंतर तीन मिनिटांत क्रीजवर पोहोचू शकत नाही, तेव्हा त्याला क्रिकेटमध्ये 'टाइम आऊट' असे म्हणतात. जर येणारा फलंदाज मर्यादित वेळेत क्रीजवर किंवा त्याच्या जोडीदाराची जागा घेण्यास तयार नसेल तर क्षेत्ररक्षण करणारा संघ 'टाईम आऊट'साठी अपील करू शकतो. अपील यशस्वी झाल्यास फलंदाज बाद घोषित केला जातो. पाकिस्तान क्रिकेट संघाकडून खेळणाऱ्या सौद शकीलच्या एका कृतीमुळे तो स्वत: आणि पाकिस्तान क्रिकेटला ट्रोल केले जात आहे.

### पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला येणार होता

. सौद शकील चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तान क्रिकेट संघाचा भाग होता. पण सौद शकील आता फलंदाजीला जायचं असतानाही झोपल्याने त्याला टाईम आऊट देण्यात आले, ज्याचा त्याच्या संघाला मोठा फटका बसला.सौद शकीलला प्रेसिडेंट कपमधील एका सामन्यात क्रिझवर जाण्यापूर्वी झोप लागल्याने टाइम-आउट देण्यात आले. शकील प्रेसिडेंट कप ग्रेड 1 प्रथम श्रेणी स्पर्धेत स्टेट बँक ऑफ पाकिस्तानसाठी पाकिस्तान टेलिव्हिजन विरुद्ध पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करणार होता. पण झोपेमुळे तो नियोजित वेळेत क्रीजवर पोहोचू शकला नाही, त्यामुळे त्याला टाईम आऊट देण्यात आले. मोठी गोष्ट म्हणजे हा आंतरराष्ट्रीय सामना नव्हता. ही पाकिस्तानमधील देशांतर्गत स्पर्धा आहे.सतत विकेट पडल्यानंतर सौद शकील पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला येणार होता, पण तो निर्धारित तीन मिनिटांत क्रिजपर्यंत पोहोचू शकला नाही.

# मुंबई इंडियन्सचा युपीवर शानदार विजय

## गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी; अमेलिया कर-हिली मॅथ्यूज ठरले स्टार

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सने उत्कृष्ट पुनरागमन करत युपी वॉरियर्जचा ६ विकेट्सने पराभव केला. मुंबई इंडियन्सच्या विजयासह संघ वुमन्स प्रीमियर लीग २०२५ च्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. मुंबईचा संघ प्लेऑफपासून अवघी काही पावलं दूर आहे. युपीने दिलेल्या १५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने १८.३ षटकांत ४ विकेट्स गमावत १५३ धावा करत शानदार विजय मिळवला. मुंबईकडून विकेटकिपर यस्तिका भाटियाने विजयी चौकार लगावत संघाचा विजय निश्चित केला.**




मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण युपीच्या सलामी जोडीने सुरूवातीच्या षटकांमध्ये मुंबईच्या गोलंदाजांची धुलाई केली. आठव्या षटकात ७४ धावांवर युपीने पहिली विकेट गमावली. तर पहिलाच WPL सामना खेळणाऱ्या जॉर्जिया वॉलची ९० धावांवर विकेट गमावल्यानंतर मुंबईच्या संघाने पुनरागमन केलं. उत्कृष्ट फॉर्मात असलेल्या जॉर्जिया वॉलने पहिल्याच सामन्यात अर्धशतक झळकावले. जॉर्जियाने ३३ चेंडूत १२ चौकारांसह ५५ धावा केल्या आणि संघाला ग्रेस हॅरिस (२८) च्या जोडीने चांगली सुरूवात करून दिली.पण युपीचे इतर फलंदाज चांगल्या सुरूवातीचे रूपांतर मोठ्या धावसंख्येत करण्यात अपयशी ठरले. या दोन्ही खेळाडूंनंतर दीप्ती शर्माने २७ धावा तर सोफी एकलस्टनने १६ धावा करत संघाला १५० धावांचा टप्पा गाठून दिला. मुंबईकडून अमेलिया कर हिने ४ षटकांत ३८ धावा देत ५ विकेट्स घेतले आहेत. वुमन्स प्रीमियर लीगमधील आणि मुंबई इंडियन्ससाठी तिने पहिल्यांदा ५ विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे. अमेलिया केरशिवाय मुंबईकडून हॅली मॅथ्यूजने २ विकेट्स तर नताली स्क्विव्हर ब्रंट आणि पारूनिका सिसोदिया हिने प्रत्येकी १ विकेट मिळवली.युपीने दिलेल्या १५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईच्या संघात मोठा बदल पाहायला मिळाला. फॉर्मात नसलेल्या यस्तिका भाटिया हिच्या जागी अमेलिया केर हिला हिली मॅथ्यूजसह सलामीला पाठवण्यात आले. पण दौन चौकारांसह १० धावा तर अमेलिया बाद झाली.

### मुंबईच्या गोलंदाजांची धुलाई

यानंतर हिली आणि नताली यांनी संघासाठी मॅचविनिंग भागीदारी रचली. हिली मॅथ्यूजने ४६ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ६८ धावांची शानदार खेळी केली. तर ऑरेंज कॅप असलेल्या नताली स्किव्हर ब्रंट हिने २३ चेंडूत ७ चौकारांसह ३७ धावा केल्या.यानंतर हरमनप्रीत कौर ४ धावा करून बाद झाल्यानंतर अमनज्योत कौर हिने १२ धावा आणि यस्तिका भाटिया हिने १० धावा करत संघाला विजय मिळवून दिला. युपीकडून ग्रेस हॅरिसने २ विकेट्स तर शनेल हेनरी आणि क्रांती गौड यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण युपीच्या सलामी जोडीने सुरूवातीच्या षटकांमध्ये मुंबईच्या गोलंदाजांची धुलाई केली. आठव्या षटकात ७४ धावांवर युपीने पहिली विकेट गमावली. तर पहिलाच WPL सामना खेळणाऱ्या जॉर्जिया वॉलची ९० धावांवर विकेट गमावल्यानंतर मुंबईच्या संघाने पुनरागमन केलं. उत्कृष्ट फॉर्मात असलेल्या जॉर्जिया वॉलने पहिल्याच सामन्यात अर्धशतक झळकावले. जॉर्जियाने ३३ चेंडूत १२ चौकारांसह ५५ धावा केल्या आणि संघाला ग्रेस हॅरिस (२८) च्या जोडीने चांगली सुरूवात करून दिली.पण युपीचे इतर फलंदाज चांगल्या सुरूवातीचे रूपांतर मोठ्या धावसंख्येत करण्यात अपयशी ठरले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। शुक्रवार ।
। दि. 7 मार्च 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## बीजेनिमित्त तीन लाख भाविकांच्या उपस्थितीत

# ‘तुकोबां’चा जागर!

### वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव; भंडारा डोंगरावर 9 मार्चपासून अमृतमहोत्सव सोहळा

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाला येत्या १६ मार्च रोजी अर्थात तुकाराम बीजेच्या दिवशी ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री जगद्गुरू तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू यांनी हा मान पुणे जिल्ह्यास दिला आहे. श्री क्षेत्र भंडारा डोंगर संस्थानचे अध्यक्ष बाळासाहेब काशिद आणि हभप ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांनी पत्रकार परिषदेत आज ही माहिती दिली.**



श्री क्षेत्र आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे हभप मारूतीबाबा कुऱ्हेकर महाराज आणि हभप ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांच्या नेतृत्त्वाने गाथा पारायण सोहळा येत्या ९ मार्च ते १७ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. भंडारा डोंगराच्या पायथ्याला हा सोहळा होईल. या पारायण सोहळ्यासाठी १५ हजार भाविक वाचक म्हणून सहभागी होणार असून मुख्य सोहळा तुकाराम बिजेच्या दिवशी होणार आहे. या दिवशी राज्यभरातून सुमारे तीन लाख भाविक गाथा पारायण सोहळ्यात सहभागी होणार आहेत. जवळपास १०० एकर जागेवर हा सोहळा होणार आहे. या सोहळ्यामध्ये दररोज ५००० गाथा वाचक सहभागी होतील. रोज १००० टाळकरी असतील. २५ मृदंगवादकांचा समावेश असेल. येत्या ९ मार्च पासून हा सोहळा सुरू होणार आहे. रोज सकाळी अकरा वाजता आणि सायंकाळी सहा वाजता कीर्तन होईल.

#### बीजेला प्रसादासाठी तीन लाख मांडे तयार करणार

तुकाराम बीजेच्या दिवशी (१६ मार्च) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आयोजकांनी दिली. तुकाराम बीजेच्या दिवशी तीन लाख मांडे केले जाणार आहेत. मुळशीतील विविध गावांमधून पाच लाख पुरणपोळीचा प्रसाद दिला जाणार आहे. एक लाख भाकरी आणि विविध भागांमध्ये केली जाणारी वेगवेगळ्या प्रकारची आमटी येथे अन्नदानात उपलब्ध असेल. सकाळी साडेनऊ ते अकरा या वेळेत वैकुंठ स्थानक, तुकाराम महाराजांचा वाडा, संस्थान देहू, भंडारा डोंगर संस्थान, भामचंद्र डोंगर, येथे हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी केली जाणार आहे.

## महापालिकेच्या वतीने रानजाई महोत्सवाचे आयोजन

### भव्य फळ-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन व स्पर्धा

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण यांच्या वतीने ‘रानजाई महोत्सव’ व २८ वे भव्य ‘फळ-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन व स्पर्धा ’ दिनांक ७ ते ९ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या महोत्सवामध्ये हिंदी मराठी गीतगायन, नृत्य, पथनाट्य, मॅजिक शो, पपेट शो, आर जे गेम्स तसेच जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले असून या महोत्सवात शहरवासियांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

महापौर निवास, सेक्टर नं २७ संत तुकाराम उद्यान शेजारी, निगडी प्राधिकरण येथे शुक्रवार ७ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमास सहकारी आणि नागरी विमान वाहतूक विभागाचे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती असणार आहे. याव्यतिरिक्त खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, अण्णा बनसोडे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, आणि



महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य अँड. गोरक्ष लोखंडे यांची सन्माननीय उपस्थिती यावेळी असणार आहे. या मान्यवरांसह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर हे देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे यांनी दिली आहे.


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
BLOSSOM YOUR KNOWLEDGE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally